श्री.सं.ना.खैरकर, सहायक कक्ष अधिकारी हे भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर या प्रतिनियुक्तीच्या ठिकाणावरुन परत आल्यानंतर मंत्रालयीन विभागात प्रत्यावर्तनानंतरची पदस्थापना करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः प्रतिनि २५१८/प्र.क्र.१०४/१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २८ मे, २०१९

शासन आदेश

संदर्भ :- १) समक्रमांकाचे दिनांक २८-०८-२०१८ चे आदेश व दिनांक २२-०४-२०१९ चे पत्र
२) श्री.सं.ना.खैरकर, यांचे दिनांक ०९-०२-२०१९ व दिनांक २०-०३-२०१९ चे अर्ज
३) गृहनिर्माण विभागाचे क्र.नियुक्ती-२०१८/प्र.क्र.७२/गृनिधो-१, दिनांक १५-०९-२०१८ चे शासन आदेश

संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक २८-०८-२०१८ रोजीच्या आदेशान्वये श्री.सं.ना.खैरकर, सहायक कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांची सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर या कार्यालयात "अधिक्षक (वर्ग-२) " या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांना प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी दिनांक १०-०९-२०१८ रोजी कार्यमुक्त केले होते. त्यानुसार श्री. खैरकर हे भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, नागपूर येथे दिनांक ११-०९-२०१८ रोजी रुजू झाले आहेत. गृहनिर्माण विभागाने त्यांना संदर्भाधिन क्र. ३ च्या आदेशान्वये रुजू करुन घेतले आहे.

२. या विभागाच्या दिनांक २८-०८-२०१८ मधील आदेशातील परिच्छेद २(ड) नुसार "त्याने (प्रतिनियुक्तीवर गेलेल्या उमेदवाराने) मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्याला मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील". ही तरतूद आहे. संदर्भाधिन क्र. २ येथील अर्जान्वये श्री.खैरकर यांनी त्यांच्या मूळ विभागात परत घेण्याची विनंती केली होती. श्री. खैरकर यांच्या सदर विनंतीस अनुसरुन त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावरुन दिनांक ०८-०५-२०१९ रोजी किंवा तत्पूर्वी कार्यमुक्त करावे अन्यथा

त्यांनी दिनांक ०९-०५-२०१९ रोजी आपला रुजू अहवाल अवर सचिव (कार्यासन १४-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे सादर करावा जेणेकरुन त्यांना पुढील नियुक्तीचे आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे दिनांक २२-०४-२०१९ च्या पत्रान्वये गृहनिर्माण विभागाला कळविले होते. गृहनिर्माण विभागाने त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावरुन दिनांक ०८-०५-२०१९ पर्यंत कार्यमुक्त न केल्यामुळे श्री. खैरकर यांनी आपला रुजू अहवाल या विभागाकडे सादर केला आहे.

३. श्री. खैरकर यांची प्रतिनियुक्तीवरुन प्रत्यावर्तनानंतरची पदस्थापना **वित्त विभागात** करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१२४८२३६६०७ असा आहे. सदरहू आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.05.28 12:55:07 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.सं.ना.खैरकर, सहायक कक्ष अधिकारी,

प्रत,

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग/ उच्च तंत्र शिक्षण विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव (आस्थापना) उच्च व तंत्र शिक्षण विभाग/वित्त विभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

३) उप सचिव (गृनिधो-१), गृहनिर्माण विभाग, नविन प्रशासन भवन,६ वा मजला,मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.

४) सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग, तहसिल कार्यालय (शहर), पहिला माळा, आकाशवाणी चौक, नागपूर-४४०००१